**ठळक बातम्या**

- भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरातून आदरांजली

- विमान उड्डाण रद्द झालेल्या प्रवाशांना तत्काळ पैसे परत करण्याचे केंद्र सरकारचे इंडिगोला आदेश, सर्व विमान कंपन्यांच्या कमाल प्रवासी भाड्यावरही निर्बंध

- सुदानमध्ये बालवाडीवर झालेल्या हल्ल्यात ३३ बालकांसह ५० जणांचा मृत्यू

आणि

- दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेतल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारत मजबूत स्थितीत

**<><><><><>**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज राज्यासह देशभरातून आदरांजली वाहिली जात आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**- - - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही बाबासाहेबांना आदरांजली वाहिली आहे. संसद भवनात आज लोकसभा सभापती ओम बिर्ला यांच्यासह संसद सदस्यांनी बाबासाहेबांच्या तैलचित्राला पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.*

*बाबासाहेबांचं दूरदृष्टी असलेलं नेतृत्व न्याय, समता आणि संविधानाच्या तत्वांवरची त्यांची निष्ठा भारताच्या वाटचालीत महत्त्वाची ठरली आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.*

*राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री आदित्य ठाकरे, काँग्रेस*

*प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्यासह इतर मान्यवरांनी चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केलं.*

*इंदू मिलच्या जागेवर सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचं काम पुढल्या वर्षी सहा डिसेंबरच्या आत पूर्ण करण्याची ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. आंबेडकर यांनी उभारलेला संघर्ष हा मानवमुक्तीचा, समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता प्रस्थापित करण्याचा होता, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. देशभरातून आंबेडकरी अनुयायी मुंबईत चैत्यभूमीवर दाखल होत असून पहाटेपासूनच अभिवादनासाठी मोठी रांग लागली आहे.)*

**<><><><><>**

जगभरात आर्थिक घसरणीची चिंता व्यक्त होत असताना भारताच्या आर्थिक विकासदरात मोठी वाढ होत असून महागाईचा दर घसरत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज म्हणाले. नवी दिल्लीत एका खासगी प्रसारमाध्यमानं आयोजित केलेल्या परिषदेत ते बोलत होते.

**- - -होल्ड - प्रधानमंत्री बाइट - - -**

जगभरात अनिश्चित वातावरण असताना भारत स्थिर आणि मजबूत आहे. जगभरातले देश एकमेकांवर विश्वास ठेवायला मागे-पुढे पाहत असताना भारत हा विश्वासार्ह पर्याय म्हणून सर्वांच्या मदतीला येत आहे, असंही त्यांनी सांगितलं.

भारताने कोणत्या देशाशी कसे संबंध ठेवावेत हा भारताचा अधिकार असून यात इतर कोणताही देश हस्तक्षेप करू शकत नाही, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी या परिषदेत स्पष्ट केलं. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या भारत भेटीमुळे भारत-अमेरिका संबंधांवर विपरित परिणाम होण्याच्या शक्यता जयशंकर यांनी फेटाळून लावल्या. अमेरिकेशी विसंवाद असल्याच्या चर्चाही त्यांनी फेटाळल्या. सगळ्या देशांशी चांगले संबंध असणं भारतासाठी महत्त्वाचं असल्याचं जयशंकर म्हणाले.

आयकरानंतर सीमा शुल्क यंत्रणेत मोठ्या सुधारणा करण्याचा केंद्र सरकारचा मानस, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यावेळी व्यक्त केला.

**<><><><><>**

युवकांनी जागरूक राहून २०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी एकत्र काम करावं, असं आवाहन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. आज स्टेच्यू ऑफ यूनिटी इथं सरदार पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त निघालेल्या राष्ट्रीय पदयात्रेच्या समारोपाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. भारताची युवा शक्ती एका महान राष्ट्रीय शक्तीचं प्रतिनिधित्व करत असून ही पिढीच देशाच्या विकासाचं इंजिन आहे, असं ते म्हणाले. युवकांनी सरदार पटेलांची मूल्यं आचरणात आणावीत, असं आवाहनही त्यांनी केलं.

<><><><><>

केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांनी आज  हरियाणातल्या पंचकुला इथं अकराव्या भारत आंतरराष्ट्रीय विज्ञान महोत्सवाचं उद्घाटन केलं. आजच्या युवा पिढीला शिक्षित करणं आणि विज्ञानाच्या क्षेत्रातली कामगिरी अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणं हा या महोत्सवाचा उद्देश असल्याचं सिंह यांनी सांगितलं. ४ दिवस हा महोत्सव सुरू राहणार आहे. या कार्यक्रमात अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांनी अंतराळ प्रवासाचे अनुभव उपस्थितांना सांगितले.

देशभरातून आलेले हजारो विद्यार्थी, तरुण संशोधक आणि विज्ञानप्रेमी या महोत्सवात सहभागी झाले आहेत.

<><><><><>

दर आठवड्याला ठराविक उत्पन्न मिळवून देणाऱ्या एका कंपनीची जाहिरात केंद्रीय मंत्री पीयूष गोयल करत असल्याचा एक व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाला आहे. या व्हिडिओत डिजिटल माध्यमातून बदल केले असून अशा प्रकारच्या कोणत्याही योजनेला सरकारचा पाठिंबा नसल्याचं केंद्र सरकारनं स्पष्ट केलं आहे. आमिष दाखवून दिशाभूल करणाऱ्या आणि आर्थिक फसवणूक करणाऱ्या गुंतवणूक योजनांना नागरिकांनी बळी पडू नये, तसंच अधिकृत स्रोतांकडून सत्यता पडताळून पहावी असं आवाहन केंद्र सरकारनं केलं आहे.

<><><><><>

इंडिगोची उड्डाणं रद्द झाल्यामुळे प्रवाशांच्या तिकिटाचे पैसे परत करण्याची प्रलंबित प्रक्रिया उद्या संध्याकाळी आठ वाजेपर्यंत पूर्ण करावी, असे निर्देश नागरी हवाई वाहतूक मंत्रालयानं इंडिगोला दिले आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(विमानाची वेळ बदलण्यासाठी प्रवाशांकडून कुठलेही शुल्क आकारु नका. त्याचप्रमाणे प्रवाशांचं साहित्य नियोजित पत्त्यावर पुढल्या ४८ तासांत पोहोचवा असे निर्देशही सरकारनं इंडिगोला दिले आहेत. त्यावर ग्राहकांच्या तिकीटाचे पैसे परत करण्याचं काम प्राधान्याने केलं जात असल्याचं इंडिगोने म्हटलं आहे. आज रद्द होणाऱ्या उड्डाणांची संख्या कालपेक्षा खूप कमी झाली आहे, येणाऱ्या काही दिवसांत यात आणखी सुधारणा होईल, असं कंपनीनं म्हटलं आहे.*

*दरम्यान विमानभाडी नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारनं आज त्यावर कमाल मर्यादा लादली. त्यानुसार ५०० किलोमीटर साठी साडे ७ हजार, १ हजार किलोमीटरपर्यंत १२ हजार, १५०० किलोमीटरपर्यंत १५ हजार आणि त्यापुढे १८ हजार रुपयांपेक्षा जास्त विमान भाडं कुठल्याही विमान कंपनीला आकारता येणार नाही. प्रवाशांच्या मदतीसाठी एअर इंडिया फेऱ्या वाढवण्याचा विचारात आहे. एअर इंडियाने इकॉनॉमी क्लासचे तिकीट दरही कमी केले आहेत.*

*दरम्यान, खोळंबलेल्या प्रवाशांची सोय व्हावी म्हणून रेल्वेने अतिरीक्त डबे जोडून अधिक संख्येनं प्रवासी वाहतूक केली आहे.)*

**<><><><><>**

दक्षिण सुदानमध्ये सुदानच्या अर्धसैनिक दलांनी केलेल्या एका बालवाडीला लक्ष्य करून केलेल्या ड्रोन हल्ल्यात किमान ५० जण ठार झाले असून यात ३३ बालकांचा समावेश आहे. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येते आहे. नागरी भागावर हल्ला झाल्यानंतर मदतीसाठी पोहोचलेल्या वैद्यकीय पथकावर आणखी हल्ला झाला. त्यामुळं मृतांची संख्या वाढली.

**<><><><><>**

दक्षिण आफ्रिकेच्या प्रेटोरिया प्रांतातल्या एका गावात आज माथेफिरूंनी केलेल्या गोळीबारात किमान ११ जण ठार झाले, तर इतर १४ जण जखमी झाले. मृतांमध्ये ३ लहान मुलांचाही समावेश आहे. या प्रकरणी पोलीस ३ हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.

<><><><><>

इंडोनेशियाच्या सुमात्रा प्रांतात चक्रीवादळामुळे निर्माण झालेली पूरस्थिती आणि भूस्खलनांमध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या ९०८ झाली आहे, तर ४०० जण अद्याप बेपत्ता आहेत. दक्षिण थायलंड आणि मलेशियामध्येही या दुर्घटनेत सुमारे २०० जण ठार झाले आहेत.

<><><><><>

पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या सशस्त्र दलांमध्ये काल रात्री सीमावर्ती भागात झालेल्या जोरदार चकमकीत किमान ५ जण ठार झाले. पाकिस्तानच्या सशस्त्र दलांनी कंदहार प्रांतात हल्ला केल्याचा दावा अफगाण तालिबानचे प्रवक्ते झबीनुल्लाह मुजाहिद यांनी केला आहे.

<><><><><>

विशाखापट्टणममध्ये सुरू असलेल्या एकदिवसीय मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारत सध्या मजबूत स्थितीत आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ३३ षटकांत १ बाद २०१ धावा झाल्या होत्या. सलामीवीर रोहित शर्मा ७५ धावा काढून बाद झाला. यशस्वी जयस्वाल ९४ धावांवर खेळतो आहे.

नाणेफेक जिंकून भारतीय संघानं क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेचा पूर्ण संघ ४७ षटकं आणि ५ चेंडूंमध्ये २७० धावा काढून तंबूत परतला. क्विंटन डिकॉक यानं १०६ धावांची उत्तम खेळी केली, तर कर्णधार टेम्बा बवुमा यानं ४८ धावा केल्या. भारताकडून कुलदीप यादव आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी ४ खेळाडू बाद केले.

आजचा सामना जिंकून मालिका २-१ नं जिंकण्याचा दोन्ही संघांचा प्रयत्न आहे.

//<><><><><>//